भगवान बुद्धांचे महाश्रावक

# आयुष्मान अनुरुद्ध

(दिव्यचक्षुधारकांमध्ये अग्र)

(मराठी)



विपश्यना विशोधन विन्यास

भगवान बुद्धांचे महाश्रावक

# आयुष्मान अनुरुद्ध

(दिव्यचक्षुधारकांमध्ये अग्र)

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

# M45 - आयुष्मान अनुरुद्ध

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम संस्करण ः मार्च 2023

**मूल्य: ₹**
**Price: Rs.**

**ISBN** 978-81-7414-462-1

**प्रकाशक:**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४१९८, २४३५५३, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

# भगवान बुद्धांची उद्घोषणा

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं**
**दिब्बचक्खुकानं यदिदं अनुरुद्धो”**

– *अङ्गुत्तरनिकाय (१.१.१९२)*

----------

“भिक्षूंनो, माझ्या भिक्षू श्रावकांमध्ये
दिव्यचक्षुधारकांमध्ये अनुरुद्ध अग्र आहे.”

# आयुष्मान अनुरुद्ध

# आयुष्मान अनुरुद्ध

## विषयानुक्रमणिका

**प्रकाशकीय ........................................................ 7**

**अनुरुद्ध ........................................................ 11**

अनुरुद्धांचा जन्म ........................................................ 11

“नाहीत” चे रहस्य ........................................................ 11

गृहस्थीचे जंजाळ ........................................................ 12

प्रव्रज्येची सशर्त अनुमती ........................................................ 14

प्रव्रज्या-ग्रहण ........................................................ 15

**निर्वाण पथावर अग्रेसर ........................................................ 16**

चित्ताच्या उपक्लेशांपासून मुक्ती ........................................................ 16

अनुरुद्धांच्या अडचणींचे निवारण ........................................................ 17

आठ महापुरुष-वितर्कांवर विचार करण्याचे फळ ........................................................ 18

**स्मृतिप्रस्थानांच्या भावनेचे माहात्म्य ........................................................ 22**

शैक्ष्य भिक्षूने स्मृतिप्रस्थानांची भावना करावी ........................................................ 22

अशैक्ष्य भिक्षूने स्मृतिप्रस्थानांची भावना करावी ........................................................ 23

स्मृतिप्रस्थानांच्या भावनेचे लाभ ........................................................ 24

स्मृतिप्रस्थानांच्या भावनेमुळे महाभिज्ञांची प्राप्ती ........................................................ 26

तृष्णेचा क्षय ........................................................ 27

स्मृतिप्रस्थान अभ्यास करणाऱ्यांचे गृहस्थीमध्ये परतणे असंभव .. 28

चित्त शारीरिक वेदनांनी अप्रभावित ........................................................ 29

अनुरुद्धांची प्रशंसा ........................................................ 30

**गुण-संपन्न आयुष्मान अनुरुद्ध ........................................................ 32**

अनुरुद्धांची ओळख ........................................................ 32

शालवनाचे आत्यंतिक वर्णन ........................................ 34
श्रावक-संगत परस्पर प्रेमभाव ........................................ 35
पञ्चकङ्ग स्थपतिच्या शंकेचे निवारण ........................................ 36
ब्राह्मणकारक धर्म 'साधना' ........................................ 37
बक ब्रह्माच्या मिथ्या-दृष्टीचे उन्मूलन ........................................ 38

**विविध प्रकरण ........................................ 40**

संस्कारांची अनित्यता ........................................ 40
पुनर्जन्म कथनाचा उद्देश ........................................ 41
पिशाच्च-योनीतून मुक्तीचे उपाय ........................................ 41
पाच गोष्टींमुळे स्त्रियांची सुगती ........................................ 42
पाच गोष्टींमुळे स्त्रियांची दुर्गती ........................................ 43

**भगवानांची परिनिर्वृत्ति कथा ........................................ 45**

अनुरुद्धांकडून शोकाकुल भिक्षूंची सांत्वना ........................................ 46

**अतीत कथा ........................................ 48**

भगवान पदुमुत्तरांचा शासनकाळ ........................................ 48
भगवान कस्सपांचा शासन काळ ........................................ 48
भगवान कस्सप आणि गौतम बुद्धांच्या शासनाच्या मधील कालावधीत ........................................ 49
अन्नभाराद्वारे प्रत्येकबुद्धाला दान ........................................ 49
अन्नभाराच्या पुण्याचा उदय ........................................ 50
भगवान गौतम बुद्धांचा शासनकाळ ........................................ 51

**विपश्यना साधना केंद्र ........................................ 52**

# प्रकाशकीय

आयुष्मान अनुरुद्धांची गणना भगवानांच्या ऐंशी महाश्रावकांमध्ये केली गेली आहे. त्यांना दिव्यदृष्टीमध्ये विशिष्टता प्राप्त होती त्यामुळे भगवानांनी आयुष्मान अनुरुद्धांना आपल्या दिव्यचक्षुप्राप्त श्रावकांमध्ये अग्र स्थानावर प्रतिष्ठापित केले होते. महाराज शुद्धोदनाच्या आवाहनावर शाक्य राजा भद्दियबरोबर ज्या पाच शाक्य कुमारांनी प्रव्रज्या ग्रहण केली त्यामध्ये आयुष्मान अनुरुद्धही होते.

अत्यंत लाडात वाढले असल्यामुळे आयुष्मान अनुरुद्ध अत्यंत कोमल आणि सुकुमार स्वभावाचे होते. ज्येष्ठ बंधू महानामाद्वारे आयुष्मान अनुरुद्धाला प्रव्रज्येसाठी प्रेरित केले गेल्यावर सर्वप्रथम त्यांनी त्यासाठी अनिच्छा दर्शवली. परंतु बंधू महानामाद्वारे गृहस्थीच्या जंजाळाबद्दल माहिती मिळाल्यावर ते लगेच प्रव्रज्या घेण्यास तयार झाले. मातेने अनुरुद्धाला सशर्त प्रव्रज्येची परवानगी दिली. अनुरुद्धाने आपल्या व्यवहार कौशल्यतेने आपला मित्र राजा भद्दिय याच्याबरोबर प्रव्रज्या ग्रहण केली.

प्रव्रज्या ग्रहण केल्यानंतर आपल्या साधने-संबंधी अडचणींविषयी आयुष्मान अनुरुद्ध एकदा आयुष्मान सारिपुत्तांना भेटले आणि म्हणाले– "आयुष्मान सारिपुत्त! माझे चित्त एकाग्र आणि समाहित तर राहते, तरीही आसक्तीरहित होऊन आस्रवांपासून विमुक्त होत नाही?" तेव्हा आयुष्मान सारिपुत्तांनी त्यांना मान, औद्धत्य आणि कौकृत्य– या तिन्हींना सोडून चित्ताला निर्वाणाकडे केंद्रित करण्याचा सल्ला दिला.

एकदा ध्यान करत असताना आयुष्मान अनुरुद्धांच्या मनात सात महापुरुष-वितर्क जागले. भगवान आयुष्मान अनुरुद्धांकडे गेले आणि त्यांची प्रशंसा करत आठवा वितर्कही सांगितला.

स्मृतिप्रस्थानांच्या भावनेमध्ये आयुष्मान अनुरुद्धांचा सखोल अभ्यास होता. दोन्ही अग्रश्रावकांबरोबर झालेल्या चर्चेमध्ये त्यांच्याकडून विचारले

गेल्यावर की शैक्ष्य आणि अशैक्ष्य भिक्षूंनी कोणत्या धर्माची भावना केली पाहिजे, आयुष्मान अनुरुद्ध म्हणाले– 'दोन्ही प्रकारच्या भिक्षूंनी स्मृतिप्रस्थानांची भावना केली पाहिजे.' याच प्रसंगी आयुष्मान अनुरुद्धांनी भिक्षूंना सांगितले की स्मृतिप्रस्थानांच्या भावनेने अभीज्ञांची प्राप्ती होते आणि तृष्णेचा क्षय होतो. स्मृतिप्रस्थानांचा अभ्यास करणारा पुन्हा कधीच गृहस्थ जीवनामध्ये परतू शकत नाही आणि स्मृतिप्रस्थानांची भावना करणारा भिक्षू आजारी पडल्यावरही त्याचे चित्त शारीरिक वेदनांनी प्रभावित होत नाही. एक दिवस आयुष्मान अनुरुद्ध ध्यानातून उठल्यावर त्यांची प्रसन्न मुद्रा बघून आयुष्मान सारिपुत्तांनी विचारले– "आयुष्मान अनुरुद्ध, आपली इंद्रिये प्रसन्न आहेत, मुखमंडल कांतिमय आहे, आपण कोणत्या प्रकारच्या साधनेमध्ये मग्न राहत असता?" आयुष्मान अनुरुद्ध म्हणाले– "आयुष्मान, मी चार स्मृतिप्रस्थानांमध्ये प्रतिष्ठित होऊन विहरत असतो." यावर आयुष्मान सारिपुत्त म्हणाले– "आयुष्मान अनुरुद्ध आम्ही लाभान्वित झालो आहोत, सुलाभान्वित झालो आहोत, जे असे सुभाषित आम्ही आयुष्मान अनुरुद्धांकडून ऐकले.

एकदा आयुष्मान अनुरुद्ध पाचीनवंसदायमध्ये आयुष्मान नंदिय आणि आयुष्मान किमिल यांच्या बरोबर विहार करत होते. तिथे भगवानांनी विचारल्यावर आयुष्मान अनुरुद्ध म्हणाले– "भंते! आम्ही सर्व एकजुट होऊन, प्रमुदित मनाने, विवाद न करता, दूध-पाण्याच्या मिश्रणाप्रमाणे राहतो.

एका प्रसंगी आयुष्मान अनुरुद्धांनी 'अप्रमाणा चेतोविमुक्ति' तसेच 'महद्गता चेतोविमुक्ति'च्या संबंधामध्ये पंचकङ्ग स्थपतिच्या शंकांचे निवारण केले. जालिनी नावाची देवकन्या जी एकदा पूर्वजन्मांमध्ये आयुष्मान अनुरुद्धांची पत्नी होती, तिला या गोष्टीसाठी झिडकारले की ती त्यांना देवलोकांच्या सुखासाठी प्रेरित करत होती. आयुष्मान अनुरुद्ध म्हणाले की आता ते परमसुख निर्वाणाला प्राप्त झाले आहेत त्यामुळे त्यांना देवलोकाची कामना नाही. आयुष्मान अनुरुद्धांनी भगवानांना स्त्रियांच्या गतिविषयी विचारल्यावर भगवानांनी त्यांना सांगितले की पाच धर्मांचे

पालन केल्याने स्त्रिया मरणोपरांत सद्गती प्राप्त करतात, आणि त्याच पाच धर्मांचे उल्लंघन केल्याने दुर्गती प्राप्त करतात.

कुशीनारामध्ये भगवानांच्या महापरिनिर्वाणावेळी आयुष्मान अनुरुद्धही तिथे उपस्थित होते. भगवानांनी महापरिनिर्वाण प्राप्त केल्याची माहिती त्यांनी आयुष्मान आनंदसहित अन्य भिक्षूंना दिली. शोक करणाऱ्या अवीतराग भिक्षूंना भगवानांनी दिलेल्या अनित्यतेच्या उपदेशांचे स्मरण करून त्यांना शांत केले. उर्वरित रात्र आयुष्मान अनुरुद्धांनी आयुष्मान आनंदबरोबर धर्मकथेमध्ये व्यतीत केली. पहाट झाल्यावर भगवानांच्या पार्थिव शरीराच्या अंतिम संस्कारांच्या व्यवस्थेचा कार्यक्रम कुशीनाराच्या मल्लांच्या मदतीने आयुष्मान अनुरुद्धांनीच तयार करविला.

विपश्यना विशोधन विन्यास